# प्रकरण दुसरे

## अभ्यासाची उद्दिष्टे व पध्दती

२.१ प्रस्तावना
२.२ अभ्यासाची उद्दिष्टे
२.३ अभ्यासाची पध्दती
२.४ अभ्यासाची व्याप्ती
२.५ मूल्यमापन

# प्रकरण दुसरे

## अभ्यासाची उद्दिष्टे व पध्दती

### २.१ प्रस्तावना :

यापूर्वी पहिल्या प्रकरणात कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ आणि शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर या संघाची सहकारी चळवळीतील भूमिका यांचे थोडक्यात विवेचन केले आहे. प्रकरण दुसरे हे अभ्यास पध्दती आणि माहिती गोळा करण्याची पध्दती यांच्याशी निगडीत आहे. या प्रकरणात या विषयाचा कोणत्या पध्दतीने अभ्यास करता येईल, माहिती गोळा करता येईल याचे विवेचन केले आहे.

### २.२ अभ्यासाची उद्दिष्टे :

महाराष्ट्रातील आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीतील नामवंत संस्था म्हणून ज्या संघाचा उल्लेख केला जातो तो शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर यांची " दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, रूकडी " हा प्रामुख्याने अभ्यासाचा विषय आहे. शेतकरी सहकारी संघाने कोल्हापूरच्या विकासात जी मौलिक भर घातली त्यात दाणेदार मिश्र खत कारखान्याची महत्वाची भूमिका आहे. कारण संघाचे ते प्रमुख यश आहे. अभ्यासाची व्याप्ती ही खत कारखान्याच्या सुरुवातीपासून सद्य:स्थिती पर्यन्त निगडीत आहे. येथे १९६८-६९ ते १९८८-८९ हा कालखंड विचारात घेतला आहे. त्यासाठीची अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे ठरविली आहेत :

१) दाणेदार मिश्र खत कारखान्याच्या सुरुवातीपासून ते ३०-६-१९८९ पर्यन्त खत कारखान्याचा अभ्यास करणे.

२) खत कारखान्याचे वार्षिक उत्पादन, त्यातील वाढ इ. चा सखोल अभ्यास करणे.

३) खत कारखान्याची दरवर्षीची विक्री, विक्रीची पध्दती आणि विक्रीचे व्यवस्थापन यांचा अभ्यास करणे.

४) खत कारखान्याच्या सरासरी स्थिर खर्चाचा अभ्यास करणे.

५) खत कारखान्याच्या सरासरी बदलत्या खर्चाचा अभ्यास करणे.

६) उत्पादन क्षमतेतील बदलाचा अभ्यास करणे.

७) खत कारखान्याची विक्री व्यवस्था अभ्यासणे.

८) आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२.३ अभ्यासाची पध्दती :

हा विशिष्ट प्रकारचा अभ्यास करताना तो कोणत्या कालावधीशी निगडीत आहे, माहिती गोळा करण्याच्या कोणाकोणत्या पध्दती आहेत या विषयी अभ्यास केला जाईल.

हा अभ्यास पूर्णपणे कारखान्यांचे अहवाल आणि कारखान्यातील कार्यालयातील रेकॉर्डवरून दुय्यम माहितीच्या आधारे करण्यात येईल.

यापैकी सांख्यिकीय माहिती ही शेतकरी सहकारी संघाच्या वार्षिक अहवालावरून मिळविली जाईल. अर्थातच ही माहिती दुय्यम स्वरूपाची अहवालाद्वारे मिळविलेली माहिती असेल याशिवाय खत कारखान्यातील जे वरिष्ठ अधिकारी आहेत त्यांच्याशी व्यक्तिगत मुलाखतीद्वारे तसेच चर्चेद्वारे माहिती एकत्रित केली जाईल. हा अभ्यास करीत असताना गेल्या १५ ते २० वर्षातील खत कारखान्याची प्रगती पाहणे हा प्रमुख उद्देश असेल. तसेच खत कारखान्याच्या प्रगतीची कारणे पाहणे हा ही या अभ्यासाचा उद्देश असेल. माहितीचे संकलन करताना त्यात कारखान्याचे प्रतिवर्षीचे उत्पादन, उत्पादन खर्च, विक्री, विक्री व्यवस्था आणि मिळालेले उत्पन्न यांचा समावेश असेल. तसेच कारखान्याच्या स्थापनेपासून ३०-६-१९८९ पर्यन्त कारखान्याच्या उत्पादन क्षमतेत वाढ झाली काय ? जर वाढ

झाली असेल तर ती केव्हा ? वाढ होण्याची गरज का निर्माण झाली ? त्याचा खर्च किती आला ? यासारख्या बाबी विचारात घेऊन अभ्यास केला जाईल.

हा अभ्यास करताना हा कारखाना रूकडी येथे सुरू होण्याची कारणे विचारात घेतली जातील. तसेच खत विक्री कोणकोणत्या सेंटर्सद्वारे होते हेही पाहिले जाईल. सर्वसाधारणपणे कारखान्यातून कोणकोणत्या खतांची निर्मिती होते, त्यासाठी लागणारा कच्चा माल कोठून आणला जातो. त्याचा सरासरी उत्पादन खर्च किती आहे आणि खत कारखाना किती फायदेशीर आहे याचा विचार केला जाईल.

खत कारखान्याची विक्री व्यवस्था कशी होती. आज त्या विक्री व्यवस्थेत बदल झाला आहे काय ? जर बदल झाला असेल तर बदलाचे स्वरूप काय या विषयी चर्चा केली जाईल. या खतांचा वापर करण्याकडेच शेतकरी वर्गाचा कल का आहे याचा तपशील मिळाला तर तोही पाहिला जाईल. अर्थात वरील सर्व गोष्टींची पूर्तता ही माहिती मिळण्याच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. हा कारखाना सुरू झाल्यापासून ३०-६-१९८९ पर्यन्त कर्मचारी वर्ग व त्याची रचना कशी आहे, त्यात कोणते बदल झाले व त्याची कारणे कोणती हेही पाहिले जाईल. म्हणजेच ग्रामीण भागात खत कारखाना सुरू झाल्यामुळे निर्माण झालेला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती याचाही विचार केला जाईल. कारखान्याची त्या भागाचा विकास करण्यातील भूमिका विचारात घेतली जाईल.

२.४ <u>अभ्यासाची व्याप्ती</u> :

या अभ्यासाची व्याप्ती प्रामुख्याने दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, रूकडी या कारखान्याशी निगडीत आहे. यात या कारखान्याचा नोकर वर्ग (स्टाफींग पॅटर्न) उत्पादन, विक्री, व्यवस्थापन यांच्याशी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

निगडीत आहे. या कारखान्याच्या सुरुवातीपासून ३०-६-१९८९ पर्यन्त झालेल्या प्रगतीच्या वेगवेगळ्या निकषाद्वारे अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रामुख्याने आमच्या अभ्यासाची व्याप्ती ही गेल्या १५ ते २० वर्षांतील खत कारखान्याच्या प्रगतीशी निगडीत आहे.

कारखान्याच्या सुरुवातीपासून ते ३०-६-१९८९ पर्यन्त वरील निर्धारित केलेली उद्दिष्टे तपासून पाहणे आणि त्याच्या आधारे निकर्ष काढणे ही अभ्यासाची व्याप्ती राहील. तसे करत असताना उत्पादन खर्च, विक्री, व्यवस्थापन, नफ्याचे प्रमाण यांच्या आधारे कारखान्याच्या प्रगतीविषयी निष्कर्ष काढले जातील. अभ्यास करीत असताना जे दोष किंवा उणीवा जाणवतील त्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला जाईल. शक्यतोवर ते दोष कमी करण्याविषयी उपाययोजनांचा उहापोह केला जाईल.

२.५ <u>मूल्यमापन</u> :

हे प्रकरण अभ्यासाची उद्दिष्टये आणि अभ्यासाची पध्दती यांच्याशी निगडीत आहे. या प्रकरण दोनमध्ये सर्वात प्रथम " दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, रूकडी " या कारखान्याचा जो अभ्यास करावयाचा आहे त्याविषयीची उद्दिष्टये सांगितली आहेत. यात अभ्यासाचा कालखंड, वार्षिक उत्पादन, खतांची विक्री, विक्रीची पध्दती, कारखान्याची उत्पादन क्षमता, त्यातील बदल अशा बाबींचा समावेश आहे. याबरोबरच हा अभ्यास कोणत्या प्रकारे करता येईल, माहिती गोळा करण्याचे मार्ग, अभ्यासाचा कालावधी (१९६८-६९ ते १९८८-८९) रूकडी येथे कारखान्याची स्थापना करण्याचा उद्देश्य, विक्री व्यवस्था या विषयी विचार केला आहे. थोडक्यात हे प्रकरण अभ्यासाची उद्दिष्टे आणि व्याप्ती यांच्याशी निगडीत आहे.

## प्रकरण तिसरे

### "दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, रूकडी" - प्रगती


३.१ प्रस्तावना

३.२ दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, रूकडी - सर्वसाधारण माहिती

३.२.१ स्थापना
३.२.२ व्यवस्थापन
३.२.३ खत कारखाना उभारणीसाठी लागलेले भांडवल व जागा
३.२.४ खेळते भांडवल
३.२.५ दैनिक उत्पादन क्षमता
३.२.६ खतसाठा गोडावन क्षमता
३.२.७ खत उत्पादन ग्रेड
३.२.८ खत कारखाना प्रशासन कर्मचारी विभागणी
३.२.९ उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल
३.२.१० कच्चामाल वाहतूक व्यवस्था
३.२.११ विक्री करणारे घटक
३.२.१२ कमिशन
३.२.१३ दाणेदार मिश्र खताचे दर
३.२.१४ बोधचिन्ह

३.३ दाणेदार मिश्र खताचे उत्पादन
३.३.१ खत उत्पादन प्रक्रिया
३.२.२ वार्षिक उत्पादन

३.४ दाणेदार मिश्र खताची विक्री (टनात)
३.५ कर्मचारी वर्ग

३.५.१ कर्मचारी वर्गातील बदल
३.५.२ कर्मचारी विभागणी
३.५.३ वेतनश्रेणी

३.६. वेतन

३.६.१ वेतन

३.७ दाणेदार मिश्र खत कारखान्याला मिळणारा नफा

३.८ खत विक्री व्यवस्था

३.९ मूल्यमापन